नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०५/२०२६ (बुधवार )**

# ४७.७३० किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु सह दुचाकी वाहन असा एकुण ८१ हजार ८५ रूपयांचा मुद्देमाल जप्त नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड** :— दिनांक ०६/०५/२०२६ रोजी नरखेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, दुचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मोहदी दळवी फाटा ते करवार रोडवर नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान ॲक्टीव्हा गाडी क्र. एम एच ४०/सी वाय ६९६८ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **आरोपी नामे राजकुमार उर्फ राजु मोतीराम नासरे, वय ४२ वर्ष, रा. वार्ड नं. १७, साई मंदीर जवळ नरखेड याला ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता सदर तंबाखु विक्री करण्यासाठी अवैधरित्या ॲक्टीव्हा वर प्लास्टीकच्या ३ चुंगडयामध्ये मध्ये प्रतिबंधीत सुगंधी तंबाखु ठेवला असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष सुगंधित तंबाखुचा एकुण ४७.७३० किलो प्रतिबंधित साठा किंमती ३१,०८५/— रूपये ॲक्टीव्हा गाडी क्र. एम एच ४०/सी वाय ६९६८ किंमती ५०,०००/—रूपये आणि एक मोबाईल असा एकुण ८१,०८५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा आणि वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे नरखेड येथे भारतीय न्याय संहीता कलम

१२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## १३ गोवंश जनावरांची सुटका, मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०६/०५/२०२६ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, भंडारा ते नागपूर रोडने अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी माथनी शिवारातील टोल नाक्याजवळ भंडारा ते नागपूर रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप क्र. एम एच ४० सी डी ४९०६ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **आरोपी क्रं १) चालक नामे अजित विनायक निर्वाण,**

**वय २९ वर्ष, रा. गायधने मोहल्ला, वार्ड नं. ५, लाखनी ता. लाखनी जि. भंडारा २) वाहक/क्लिनर आरोपी आकाश श्रीराम गायधने, वय २८ वर्ष, रा. मु.पो. सिल्ली, ता. जि. भंडारा हे मिळुन आले.** पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १३ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन, निर्दयीपणे वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक बोलेरो पिकअप क्र. एम एच ४०/सी डी ४९०६ किंमती ५,००,०००/—रूपये आणि १३ गोवंश जनावरे किंमती १,१८,०००/—रूपये असा एकुण ६,१८,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध कलम ११(१) (ड) (ई) (ह), (फ) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध अधि. १९६० सहकलम ५ (अ) (ब), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

# कोंढाळी पोलीस स्टेशन येथील दरोडयाच्या गुन्हयातील सन २०२४ पासुन मिळुन येत नसलेल्या पाहीजे आरोपीला अटक स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी :—** दिनांक १०/१२/२०२४ रोजी फिर्यादी गजानन सुखदेवराव ब्राम्हणे, वय ४० वर्ष, रा. मुलताई चौक, वरूड, ता. वरूड, जि. अमरावती यांनी पोलीस स्टेशन कोंढाळी येथे तक्रार दिली की, फिर्यादीच्या मित्राला एका अज्ञात व्यक्तीने फोनवरून सांगितले कि, जमीनीतील गुप्त धन पिवळे सोने माझेकडे असुन ते मी किंमतीमध्ये विकतो. त्यानंतर नमुद आरोपीने पिवळया धातुचे नाणे फिर्यादीस आणि त्याच्या मित्रांना आणुन दाखविले. आरोपींनी फिर्यादीस पोलीस ठाणे कोंढाळी जि. नागपुर हद्दीतील अंकलेश्वर धाबा येथे बोलावले. आरोपींनी फिर्यादीकडील रोख रक्कम रोख रक्कम १८,००,०००/— घेतली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीस वेगवेगळ्या ठिकाणी फिरवून वेळ मारून नेली. पुढे कोंढाळी ते काटोल रोडवरील गजकेसरी रिसॉर्ट जवळ आरोपींनी संगनमताने बनावट पोलीस असल्याचे भासवून फिर्यादीस अडवून धमकावले, मारहाण केली व त्यांच्या खिशातील रोख रक्कम ३,०००/— रूपये तसेच मोबाईल जबरदस्तीने हिसकावून घेतला. फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोस्टे कोंढाळी येथे अप. क्र. ८२२/२४ कलम ३१०(२), ३१८(४), ३१६(२), २०४, ६१(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

**सदर गुन्हयातील आरोपी नामे संजय सुरेश गावंडे उर्फ संजू महाराज , वय ४२ वर्षें, राहणार पिपरी मेघे, वर्धा अमरावती हा गुन्हा घडल्यापासुन मिळुन येत नव्हता.** सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान यापुर्वी १२ पैकी ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपी क्रं १) प्रमोद उर्फ पप्पु कृष्णकुमार अवस्थी, २) आशुतोष उर्फ आशु प्रमोद अवस्थी दोघे रा. फ्लॅट क.१०३, ताजश्री पॅलेस, जगनाडे चौक, नागपूर,३) विनोद चिंधुजी मस्करे, रा. मलकापुर पोस्टे कवठा बहाडे, ता. जि. अमरावती,४) शेख एजाज शेख अहमद ,रा. पाणीचे टाकीजवळ, परतवाडा जि. अमरावती ५) उमरखान साहेबखान पठाण ,रा. वार्ड क्रमांक १७, बंगला चौक, वरुड ता. वरुड जि. अमरावती,७) राजेंद्र नथ्थुजी धुताले ,व्यवसाय मजुरी, रा. बौध्द विहार जवळ, खोलवटपुरा, मोर्शी ता. मोर्शी जि. अमरावती, ९) अमीत शेषराव तसरे, रा. इंदीरा नगर, चांदुर रेल्वे ता. चांदुर रेल्वे जि. अमरावती,८) विलास रामराव पंडीत ,रा. यशोदा नगर, फ्रेजरपुरा ता. जि. अमरावती, ९) पियुष निलकमल खैरवाल, गरोबा मैदान, नागपुर, १०)

संजु महाजन, रा.वर्धा, आणि क्रं ११) सुमित उर्फ सुमेध दत्तोपंत आठवले, वय ५० वर्ष, राहणार संजय गांधी नगर, अमरावती यांना यापुर्वी अटक करण्यात आली असुन सदर आरोपी हे टोळीने कट रचुन याप्रकारचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी,उपविभाग काटोल यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सदर गुन्हयाच्या समांतर तपासादरम्यान सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण यांच्या मदतीने तांत्रिक पुराव्यावरून सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी क्रं १२) संजय सुरेश गावंडे उर्फ संजू महाराज , वय ४२ वर्षे, राहणार पिपरी मेघे, वर्धा अमरावती याला दिनांक ०५/०५/२०२६ रोजी वर्धा येथुन ताब्यात घेतले असुन आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## महीलेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन मौदा** :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे अप क्र. २१/२०१८ कलम ३५४(ब),४५२,५०६ भादवी अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १६/०१/२०१८ रोजी यातील **आरोपी नामे चंद्रशेखर गजानन टिचकुले, वय ४३ वर्षे, रा. तितुर, ता. कुही, जि. नागपुर** याने सदर गुन्हयातील पिडीत /फिर्यादीच्या घरात घुसुन तिला अश्लिल स्पर्श करून तिचा हात पकडुन तिचा विनयभंग केला तसेच तिला धमकी दिली होती.

श्री चांगदेव कुकडे, पोलीस हवलदार, नेम पोलीस स्टेशन मौदा यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०६/०५/२०२६ रोजी मा. प्रथमश्रेणी न्यायधीश, मौदा श्री पठाण यांनी नमुद आरोपी नामे चंद्रशेखर गजानन टिचकुले, वय ४३ वर्षे, रा. तितुर, ता. कुही, जि. नागपुर यास कलम ३५४ (ब) मध्ये दोषी ठरवुन २ वर्ष साधा कारावास व ३००० /— रूपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री भगत यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग, पोलीस

निरीक्षक श्री. सारिन दुर्गे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मौदा , पोलीस निरीक्षक यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार पोअं सतिष मोटघरे ब. नं. ७४ यांनी मदत केली आहे.

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक ०५/०५/२०२६ रोजी काटोल पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता बस स्टॉप काटोल येथे **आरोपी नामे मोनु अशोक कुमार, वय ३४ वर्ष, रा. म.स.२८७ विकास नगर, लोणी ता. गाजीयाबाद, जि. गाजीयाबाद उत्तरप्रदेश** हा स्वत:चे **अ**स्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्यास विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने संशयीत रित्या फिरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १५ गुन्हे नोंद

दिनांक ०५/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १०१७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे शिवप्रसाद गणाराम दसमेर, वय ६५ वर्ष, रा. कटटा ता. रामटेक याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे सुधाकर

गुणवंतराव काकडे, वय ५५ वर्ष, रा. वार्ड क्र ०१, बोरखेडी रेल्वे, ता. जि नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १) महेश विठठल मंदीरकर, वय २५ वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही, जि. नागपुर २) रघुपती मोरबा मरस्कोल्हे, वय ५० वर्ष, रा. बोरी, ता. कुही, जि.नागपुर ३) गुडडु मिताराम भजनकर, वय २४ वर्ष, रा. अडम, ता. कुही, जि. नागपुर याचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी क्र. १) नामे यश दिनेश बावरया, वय २१ वर्ष, रा. कलमना, त. जि. नागपुर २) महिला आरोपी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी क्र. १) नामे जगदीश कूष्णाजी काळे, वय ३८ वर्ष, रा. खैरगाव, ता. नरखेड २) श्रीधर मनोहर भलावी, वय ३५ वर्ष, रा. चौरखैरी, ता नरखेड याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे आरोपी नामे प्रकाश भगवान मौजे, वय ४१ वर्ष, रा. उपरवाही, ता. कळमेश्वर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे श्रीकृष्णा दिवाकर सहारे, वय ३० वर्ष, रा. निमतलाई, ता. सावनेर, जि.नागपूर याचे वर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी क्र. १) नामे रवी शंकर मडावी, वय ३० वर्ष, छत्रापुर ह. मु घाटोळे ले आउट, प्लॉट न ५ सावनेर २) पवन ईश्वर पाटील, वय ३६ वर्ष, रा. तिष्टी (बु) ता. कळमेश्वर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी क्र. १) नामे रमेश गोविंद ढोमणे, वय ६८ वर्ष, रा. सोनार मोहल्ला पिपरी कन्हान ता. पारशिवणी २) राजेश छोटेलाल सुरने, वय ४२ वर्ष, रा. नविन गोंडेगाव, ता. पारशिवणी, जि. नागपूर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे २ गुन्हे नोंद,

**नमुद कारवाईत एकुण १) ७३.५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) ११,८८० मिली देशी दारू असा एकुण १०,१७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**